# ५. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते. लोकशाहीला असणारे धोके ओळखून त्याचे निराकरण करावे लागते. त्यासाठी लोकशाही समोर कोणती आव्हाने आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

**भारतीय लोकशाही समोरील आव्हाने**:

लोकशाही यशस्वी करण्यासाठी शासनाने सतेचे विकेंद्रीकरण केले. महिला व दुर्बल घटकांना आरक्षण दिले.

१. **जमात वाद व दहशतवाद** - भारतात सतत धार्मिक संघर्ष होत असतात .दहशतवाद निर्माण होतो समाजातील स्थैर्य नष्ट होते त्यामुळे लोकांचा लोकशाहीतील सहभाग कमी होतो.

२. **डावे उग्रवादी (नक्षलवादी**- नक्षलवाद ही खूप मोठी समस्या आहे. भूमीहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला. पण हा मूळ हेतू नष्ट होऊन नक्षलवादी हिंसक झाले आहेत. सरकारवर, पोलिसांवर हल्ले करणे हे मार्ग ते वापरत आहेत.

३. **भ्रष्टाचार** : भारतात भ्रष्टाचाराची समस्या खूप आहे. भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होते. लोकांमध्ये अविश्वास व असमाधानाची भावना निर्माण होते. भ्रष्टाचार, बनावट मतदान, मतदारांना लाच देणे इ. मुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो.

४. **राजकारणाचे गुन्हेगारीकरण** : राजकीय प्रक्रियेमध्ये गुन्हेगारांचा वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक मोठी समस्या आहे. गुन्हेगारी पाश्वभूमी, गुन्हेगारी स्वरुपाचे आरोप, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या लोकांना उमेदवारी दिल्याने राजकारणात पैसा व गुंडगिरी यांचे महत्त्व वाढते. त्यामुळे निवडणुकीच्यावेळी हिंसाचाराचा वापर होऊ शकतो.

५. **सामाजिक आव्हाने**: बेरोजगारी, व्यसनाधीनता, दुष्काळ, साधनसंपत्तीचे असमान वितरण, गरीब- श्रीमंत यांच्यातील वाढती दरी, जातीयता इ . सामाजिक प्रश्न भारतापुढे आहेत.

**भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी करावयाचे उपाय**.

१. लोकशाही बहुमत खूप महत्त्वाचे असते. संसदेमध्ये सर्व निर्णय बहुमताने घेतात. अल्पमतात असणारे आणि अल्पसंख्य असणारे यांच्यावर बहुमताला महत्त्व देताना अन्याय होण्याची शक्यता असते म्हणून त्याच्या हितसंबंधाचा विचार केला गेला पाहिजे म्हणजेच लोकशाहीत सर्वांच्या मतांना महत्त्व असायला हवे. सर्व धार्मिक, वांशिक, भाषिक, जातीय गटांना लोकशाहीमधील निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची समान संधी मिळायला हवी.

२. राजकीय प्रक्रिया पारदर्शक व्हायला हवी. राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखायला हवे त्यासाठी गुन्हेगारांना कडक शिक्षा आणि राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यास बंदी घातली पाहिजे.

३. भारतातील लोकशाही यशस्वी होण्यासाठी प्रत्येक सामाजिक व वैयक्तिक पातळीवर जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. शासकीय व प्रशासकीय पातळीवर सर्व शिक्षा अभियान, स्वच्छ भारत अभियान, ग्राम समृद्धी योजना, यांसारखे उपक्रम राबवले जातात.

४. भारतीय लोकशाही यशस्वी ठेवण्यासाठी सर्वच नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. आपण देशाचे एक जबाबदार नागरिक आहोत ही जाणीव प्रत्येकाने ठेवली तरच लोकशाही यशस्वी होईल.